KAYASTH
Caters & Event Management

Rajendra Deochand Kayasth-9657572742 | 7350565657
Karanja Chowk,Shiv Shopping Complex,Buldana-443001

RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784

आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN

संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

वर्ष ३ रे अंक : १४९ वा शनिवार दि. १९ जुलै २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# ठाकरेंचा नेता फडणवीसांच्या उपस्थितीत कमळ धरणार...

## आम्ही आयुष्यभर सतरंज्याच उचलायच्या का? भाजप निष्ठावंतांचा भडका

वृत्तसंस्था/जळगाव

जळगाव महापालिकेतील उद्धवसेनेच्या माजी पदाधिकाऱ्यांच्या भाजप प्रवेशाच्या हालचालींना वेग आला आहे. प्रवेशावरून भाजपमध्येच नाराजीनाट्य सुरू झाले आहे. भाजपतील स्थानिक पदाधिकाऱ्यांनी लोकसभा व विधानसभेत विरोधात प्रचार करणारे हे पदाधिकारी भाजपत आल्यावर आम्ही निष्ठावंतानी आयुष्यभर सतरंज्याच उचलायच्या का? अशा संतप्त भावना इंमटाफ शी बोलताना व्यक्त केल्या आहेत. महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजण्यापूर्वीच जळगावात राजकीय हालचालींना वेग आला आहे. मागील निवडणुकीत ७५ पैकी ५७ जागांवर विजय मिळवून भाजपने जळगाव महापालिकेत सत्ता स्थापन केली. मात्र, त्यानंतर शिवसेनेने (फूटीपूर्वी) भाजपचे २७ नगरसेवक फोडून आपला महापौर व उपमहापौर निवडून आणला. मुदत संपली त्यावेळी महापालिकेत शिवसेनेची सत्ता होती. मात्र, आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता शिवसेनेतील (उबाठा) माजी महापौर नितीन लड्ढा यांच्यासह अनेक माजी नगरसेवकांनी भाजपत प्रवेश करण्याची तयारी केली आहे. नितीन लड्ढा व सुनील महाजन हे माजी मंत्री सुरेश जैन यांचे कट्टर समर्थक आहेत. मुदत संपली त्यावेळी महापालिकेत शिवसेनेची सत्ता होती. मात्र, आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता शिवसेनेतील (उबाठा) माजी महापौर नितीन लड्ढा यांच्यासह अनेक माजी नगरसेवकांनी भाजपत प्रवेश करण्याची तयारी केली आहे. नितीन लड्ढा व सुनील महाजन हे माजी मंत्री सुरेश जैन यांचे कट्टर समर्थक आहेत. दरम्यान, या पदाधिकाऱ्यांच्या भाजपतील संभाव्य प्रवेशाला भाजपातील स्थानिक निष्ठावंत पदाधिकाऱ्यांचा विरोध आहे. लोकसभा निवडणुकीत याच लोकांनी भाजपच्या उमेदवाराविरोधात काम केले. तरी देखील




आम्ही निष्ठावंतानी खासदार स्मिता वाघ यांना तसेच विधानसभेत आमदार सुरेश भोळे यांना मताधिक्क्याने विजयी केले. आता, विरोधात काम करणारे हे पदाधिकारी भाजपत सन्मानाने येणार. त्यामुळे आम्हाला महापालिका निवडणुकीत उमेदवारीची संधी मिळणार कशी? असा प्रश्न भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे खासदार व आमदारांनी आमच्या भावना वरिष्ठांपर्यंत पोहचवाव्यात, अशी अपेक्षा भाजपतील स्थानिक पदाधिकारी करीत आहेत.

## घरात घुसून सैनिकाच्या पत्नीशी लगट करण्याचा प्रयत्न!

जनसंचलन/ चिखली

विद्युत मीटर तपासण्याच्या नावाखाली भर दुपारी घरी जाऊन सैनिकाच्या पत्नीशी वाईट उद्देशाने लगट करणाऱ्या महावितरणच्या भरारी पथकामधील एका अभियंत्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.आशिष देशमुख रा.महावितरण विद्युत कंपनी, भरारी पथक बुलढाणा, असे आरोपीचे नाव असून ही घटना चिखलीतील श्रीकृष्ण नगरात समोर आली. महिला सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.जिल्ह्यात अनेक संतप्त आणि धक्कादायक घटना घडत आहे. अशात चिखली येथे १८ जुलैला श्रीकृष्ण नगरात महावितरणच्या भरारी पथकामधील आशिष देशमुख हा अडीच वाजताच्या सुमारास



पीडिताच्या घरी अनाधिकृतपणे घुसला आणि वाईट उद्देशाने पिडीतेला त्याने ओळख वाढविण्याचा प्रयत्न केला.माझा पर्सनल नंबर घे आणि माझ्या संपर्कात रहा असाही आरोपी म्हणाला. दरम्यान पिडीतेने विरोध दर्शविला असता,आरोपी आशिष ने दमदाटी केली, अशी तक्रार पोलिसात दिल्यावरून पोलिसांनी अप नं.५५४/२५ कलम३३३,७८(२),३५१(२) बिएनएस प्रमाणे पुन्हा दाखल केला आहे.तक्रारकर्त्या महिलेचा पती सध्या जम्मू काश्मीर येथे भारतीय सैन्य दलातकार्यरतआहे.

## चिमुरडीवर लैंगिक अत्याचार; तिसऱ्या आरोपीला अटक




जनसंचलन/ खामगांव

तालुक्यातील एका गावातील ७ वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार केल्याच्या प्रकरणात तिसऱ्या आरोपीला अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला दि. २१ जुलैपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. जून महिन्यात समोर आलेल्या या धक्कादायक प्रकरणात पीडित बालिकेवर दोन वेळा अत्याचार झाल्याची तक्रार दाखल झाली होती. पहिल्या घटनेत दोन अल्पवयीन बालकांचा सहभाग असल्याचे उघड झाले होते. पोलिसांनी या दोघांना ताब्यात घेऊन बाल न्यायालयात हजर केले होते

# मानव-हत्ती सहअस्तित्वासाठी...

## संपादकीय लेख

भारतीय संस्कृतीत हत्तीला सन्मानाचे स्थान आहे. परंतु गेल्या काही दशकांमध्ये मानव-हत्ती संघर्ष ही गंभीर समस्या ठरत आहे. आसाममध्ये सन २००० ते २०२३ दरम्यान मानव-हत्ती संघर्षात एक हजार ४०० व्यक्तींचा मृत्यू झाला, तर याच कालावधीत एक हजार २०९ हत्तींचा मृत्यू झाला. यातील ६२६ हत्तींचा मृत्यू मानवी हस्तक्षेपामुळे झालेला आहे, असे ह्वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या ताज्या अहवालात म्हटले आहे. मानव-हत्ती सहअस्तित्वासाठी उपाययोजनांची गरज यामुळे अधोरेखित होते. मानवी हस्तक्षेपामुळे हत्तींच्या मृत्यूंमध्ये सर्वाधिक २०९ हत्तींचा मृत्यू विजेच्या धक्क्यामुळे झाला आहे. अपघातामुळे १२७, मानवासंबंधी अन्य कारणांमुळे ९७, रेल्वेच्या धडकेमुळे ६७, शिकारीमुळे ५५, विषबाधेमुळे ६२, बदल्याच्या भावनेतून हत्या पाच, तर वाहनांच्या धडकेमुळे चार हत्तींचा मृत्यू झाल्याचे या अहवालात म्हटले आहे. नैसर्गिक कारणांमुळे झालेल्या हत्तींच्या मृत्यूंमध्ये ३४४ मृत्यू हे वय, हृदयविकाराचा धक्का, बुडून, वीज कोसळल्यामुळे किंवा टेकडीवरून पडल्याने झालेले आहेत. हद्दीवरून संघर्षामध्ये ८१ हत्तींनी प्राण गमावले आहेत. वास्तविक प्रौढ नर हत्ती हे हत्तीसंख्येचा पर्यावरणीय मूलाधार असतात आणि सामाजिक संरचना, जीन प्रवाह आणि कळपामधील परस्परसंबंध सुदृढ राखण्यात ते महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र, मनुष्यप्राण्यांकडून विजेच्या धक्क्यामुळे होणारे मृत्यू किंवा बदल्याच्या भावनेने हत्तींची हत्या अशा घटनांत प्रौढ नर हत्ती जीव गमावताना दिसतात. हत्तींचे असे मृत्यू रोखण्यासाठी वीजवाहिन्यांची योग्य देखभाल



आणि कुंपणांत जाणीवपूर्वक वीजप्रवाह सोडण्याला आळा घालणे गरजेचे आहे. मानव-हत्ती संघर्ष कमी करण्यासाठी हत्तींच्या अधिवासाचे संवर्धन आणि पुनरुज्जीवन, पायाभूत सुविधांमध्ये बदल आवश्यक आहेत. त्यासाठी जनसहभाग गरजेचा आहे. दोन अधिवासांना जोडणारे कॉरीडॉर सुरक्षित करणेही निकडीचे आहे, याकडे या अहवालाने लक्ष वेधले आहे. त्यासाठी वन विभागाच्या सहभागाने प्रयत्न, अधिकाऱ्यांना प्रगत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे, रेल्वे आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय या गोष्टी करायला हव्यात, असे अहवाल म्हणतो.

# नवीन ग्रामपंचायत अधिकारी यांनी डोणगांव येथील अतिक्रमण सात दिवसांत काढावे.

**जनसंचलन/ डोणगाव**

डोणगाव ग्रामपंचायत सध्या विविध कारणांनी गाजत असतांना असताना डोणगाव येथील ग्रामविकास अधिकारी दीपक तांबारे यांना झालेल्या विविध तक्रारी मुळे व खासकरून डोणगाव येथील अतिक्रमणाच्या मुद्द्यांवरून निलंबित करण्यात आले व त्यांच्या जागी नवीन ग्रामविकास अधिकारी विजय दांडगे यांची नेमणूक करण्यात आली परंतु दि. १७ जुलै ला काँग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष शैलेश सावजी यांनी मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांना एक पत्र दिले त्यामध्ये त्यांनी ज्या कारणास्तव ग्रामविकास अधिकारी दीपक तांबारे यांना निलंबित केले आणी नविन ग्रामविकास अधिकारी डोणगाव ला दिला त्या ग्रामविकास अधिकारी यांच्या कडून तांबारे यांनी न काढलेल्या अतिक्रमण काढण्याची कारवाई सात दिवसांत करुन घ्यावे व ज्या कारणासाठी तांबारे निलंबित करण्यात आले त्या कारणास्तव नवीन ग्रामविकास अधिकारी यांना निलंबित करण्याचे काम पडू नये असे नमूद आहे. (डोणगाव हे मेहकर तालुक्यातील सर्वात मोठे गाव आहे या ठिकाणी मुख्यालयी राहणारा ग्रामपंचायत अधिकारी मिळणे आवश्यक आहे. पण डोणगाव येथे येणारे ग्रामपंचायत अधिकारी हे डोणगाव येथे न राहता इतर ठिकाणाहून येजा करीत असल्याने समस्या निर्माण होत आहे त्यामुळे मुख्यालयी राहणारा ग्रामपंचायत अधिकारी डोणगाव ला द्यावा अन्यथा डोणगाव येथे मुख्यालयी न राहणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी यांच्या वर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.) (मी डोणगाव चा पदभार १७ जुलै ला घेतला असून अतिक्रमणाबाबत माहीती घेऊन सरपंच व सदस्य यांच्यासह नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

# घरातच देहव्यापाराचा अड्डा चार जणांविरोधात कारवाई

**जनसंचलन/ डोणगाव**

अंजनी बु, येथे घरामधून चालविल्या जात असलेल्या देहव्यापाराचा पर्दाफाश करीत पोलिसांनी चार जणांना रंगेहात अटक केली आहे. शुक्रवारी पहाटे गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकून ही कारवाई केली. अनैतिक व्यवहार मानवी प्रतिबंधक अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. गुप्त माहितीच्या आधारे मेहकरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील, लोणारचे ठाणेदार निमिष मेहेत्रे, मेहकरचे ठाणेदार अटक आरोपींना १८ जुलै रोजी न्यायालयात हजर करण्यात आले असून, पुढील तपास ठाणेदार नागरे करीत आहेत. आलेवार, डोणगावचे ठाणेदार अमरनाथ




नागरे आणि पोलिस पथकाने ही कारवाई केली. शारदा त्र्यंबक नागोलकर (२९), कविता त्र्यंबक नागोलकर (३१), वामन किसन लाड (५५) आणि विजय दत्ता बोरकर (२५) या चार आरोपींना आर्थिक फायद्यासाठी देहव्यापार करीत असताना रंगेहात पकडले. पोलिसांनी पंचनामा करून घटनास्थळावरून ९ हजार ६०० रुपयांची रोख रक्कम, ११ हजाराचे मोबाइल, यूपीआय स्कॅनर असा एकूण २१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी ठाणेदार निमिष मेहेत्रे यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला

# गुरु रविदास समता परिषद व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्षपदी नारायण अन्नपुरे यांची निवड !

**जनसंचलन/ नांदेड**

अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद व्यापारी आघाडी नांदेड जिल्हाध्यक्षपदी नारायण ज्ञानदेव अन्नपुरे पुयनीकर यांची निवड करण्यात आली.

विजयनगर तरोडा बु. नांदेड येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत ही निवड घोषित करण्यात आली तसेच नियुक्तीपत्र देऊन नारायण ज्ञानदेव अन्नपुरे यांचा सत्कार करण्यात आला. लवकरच जिल्ह्यातील व्यापाऱ्यांची बैठक घेऊन व्यापारी आघाडीची सविस्तर कार्यकारिणी निवडण्यात येणार असल्याचे नारायण अन्नपुरे यांनी जाहीर केले.

यावेळेस लक्ष्मण व्यंकटराव वाघमारे यांचीही अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेच्या नांदेड उत्तर महानगर अध्यक्षपदी निवड करण्यात आली व त्यांचाही नियुक्तीपत्र देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवानंद जोगदंड, दादाराव वाघमारे, कर्मचारी जिल्हाध्यक्ष भीमराव वाघमारे, नांदेड महानगर अध्यक्ष श्रीनिवास कांबळे, हणमंत निंबाळकर, लक्ष्मण हंबर्डे, देविदास टोम्पे, सतीष भालके, साहेबराव ढगे, राजू बनसोडे आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बिहारमधील नागरिकांना १२५ युनिट मोफत वीज; निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांची घोषणा...

**पाटणा:** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही मतदारांच्या दृष्टीने लोकप्रिय पाऊल उचलले. राज्यातील सर्व घरगुती ग्राहकांना १२५ युनिटपर्यंत मोफत वीज देण्याची घोषणा त्यांनी गुरुवारी केली. त्यांचे प्रतिस्पर्धी आणि ङ्गराजदफ नेते तेजस्वी यादव यांनी, सत्तेत आल्यास २०० युनिट मोफत वीज देण्याचे आश्वासन या आधीच दिलेले आहे.या निर्णयाची अंमलबजावणी तत्काळ होणार असून, मोफत वीजेचा लाभ नागरिकांना १ ऑगस्टपासून मिळेल, अशी घोषणा नितीश कुमार यांनी



सोशल मीडियावर केली आहे. याचा अर्थ १२५ युनिटपर्यंत वीजवापर केलेल्या घरगुती ग्राहकांना जुलै महिन्याच्या देयकामध्ये कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. याचा फायदा बिहारमधील एक कोटी ६७ लाख नागरिकांना होणार असल्याचे नितीश कुमार यांनी म्हटले आहे.सध्याच्या परिस्थितीत बिहारला ग्रिडमधून उच्च दराने वीज मिळत असूनही आम्ही सर्व ग्राहकांना स्वस्त वीजपुरवठा करीत आहोतफ, असा दावाही त्यांनी आपल्या पोस्टमध्ये केला आहे. सोशल मीडिया पोस्टमध्ये नितीश कुमार यांनी बिहारमध्ये सौरऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी जोरदार समर्थन केले आहे. पुढील तीन वर्षांत पर्यायी उर्जास्रोतांच्या माध्यमातून राज्यात अंदाजे १० हजार मेगावॉट वीजनिर्मिती होईल,
असा अंदाजही त्यांनी व्यक्त केला आहे.कुटीर ज्योतीफ या पूर्णपणे राज्य-अनुदानित योजनेफबद्दलही त्यांनी पोस्टमध्ये भाष्य केले आहे. या योजनेमध्ये सार्वजनिक ठिकाणी तसेच गरिबांच्या घरांच्या छतावर त्यांच्या संमतीने सौर पॅनेल बसवण्याचा समावेश आहे.बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या मतदारयादी फेरपडताळणी प्रक्रियेवर काँग्रेसने पुन्हा एकदा टीकास्त्र सोडले आहे. मोठ्या प्रमाणात मतदारांना मतदानापासून वंचित ठेवून निवडणुकांमध्ये फेरफार करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहे , असा आरोप काँग्रेसने गुरुवारी केला. निवडणूक आयोग हा पूर्णपणे भाजपची निवडणूक चोरी शाखा झाली आहे का , असा बोचरा प्रश्न काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उपस्थित केला आहे.

# पुणेकरांच्या प्रवासाला आणखी गती मिळणार, चार नव्या वंदे भारत सुरु होणार...



**पुणे :** कर्नाटक, तेलंगणा, गुजरात आणि विदर्भात जाणाऱ्या पुणेकरांसाठी आनंदाची बातमी आहे. पुणेकरांचा प्रवास गारेगार आणि सुकर होणार आहे. पुणे स्टेशनवरुन लवकरच चार नव्या वंदे भारत सुरु होणार असल्याची माहिती आहे. सध्या दोन वंदे भारत पुण्याहून कोल्हापूर आणि हुबळीसाठी धावत आहेत. यात आता आणखी ४ ट्रेनची भर पडत असल्याने पुणेकरांची प्रवासाची चिंता मिटणार आहे. यामुळे पुणे जंक्शन एकूण सहा वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांचे केंद्र बनू शकणार आहे.पुणे-शेगाव, पुणे-बेळगाव, पुणे-बडोदा आणि पुणे-सिकंदराबाद या नव्या वंदे भारत एक्स्प्रेस सुरु होणार आहेत. त्यामुळे पुणेकरांना महाराष्ट्रातील तसेच इतर राज्यातील विविध शहर गाठणे काही तासांतच गाठणे शक्य होणार आहे आणि प्रवाशांच्या वेळेचीही बचत होणार आहे.महाराष्ट्रातील मुख्य शहर असणाऱ्या पुण्यातून वंदे भारत सुरु झाल्यास प्रवाशांसाठी येणे जाणे सुलभ होणार आहे. तसेच रेल्वे वाहतुकीतही सुसुत्रता येण्यास मदत होणार आहे. तर प्रवाशांचा वेळही २ तासांनी कमी होऊ शकणार आहे. यासोबतच आगामी काळात भारतीय रेल्वेकडून पुणे आणि नागपूर दरम्यान वंदे भारत स्लीपर ट्रेन सुरु केली जाण्याची देखील शक्यता आहे.

# राऊतांकडून ३०० कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप, संग्राम जगतापांची टीका, म्हणाले, ईडीचा प्रसाद...

**अहिल्यानगर :** आमच्या माता भगिनींसाठी टीव्हीवर रोज मनोरंजनात्मक मालिका असतात तसे शिवसेनेचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांचे रोज सकाळचे वक्तव्य हे सर्वांसाठी एक मनोरंजन केंद्र आहे. त्यांना फार कोणी गांभीर्याने घेत नाही. सत्तेत असताना त्यांना कोणताच विकास करता आला नाही आणि तेच आता कामे करणाऱ्यांवर खोटे आरोप करतात, अशी टीका अहिल्यानगरचे राष्ट्रवादीचे आमदार संग्राम जगताप यांनी केली आहे. ज्यांचे हात भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत, ज्यांनी भ्रष्टाचाराच्या आरोपात ईडीचा प्रसाद घेत अनेक महिने जेलमध्ये काढले आहेत अशा राऊत यांना सर्वजण भ्रष्टाचारीच दिसतात.



खासदार राऊत यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन अहिल्यानगरमध्ये महानगरपालिकेने ३०० ते ४०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला होता. त्यावर आमदार जगताप यांनी उत्तर देताना राऊत यांच्यावर टीका केली. जगताप म्हणाले, ङ्गज्या कामांसंबंधी राऊत यांनी टीका केली, त्यावेळी त्यांच्याच पक्षाचा महापौर होता. त्यावेळी ते का बोलले नाहीत? जर एवढा भ्रष्ट्राचार झाला, तर मग एकही काम दिसेल नसते. राऊत यांना नगरमधून चुकीची माहिती दिली जाते. त्यामुळे ते तोंडघशी पडतात,फ असेही जगताप म्हणाले. जगताप पुढे म्हणाले, खासदार राऊत हे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे स्वयंघोषित नेते आहेत. स्वत:चा टीआरपी वाढविण्यासाठी ते वादग्रस्त विधाने करतात. त्यांना माहिती देणारे अनेकदा तोंडघशी पडले आहेत.

त्यांच्या अशा खोट्या आरोपांना भीक न घालता अहिल्यानगरचा विकास वेगाने सुरू ठेवणार आहे. कितीही खोटे आरोप करून विकासकामांमध्ये खोडा घालून थांबवण्याचा प्रयत्न केला तरी कामे थांबणार नाहीत. अहिल्यानगरला बदनाम करण्यासाठी शहरातील काही उपद्रवी लोकं त्यांना अशी खोटी माहिती देत आपली दुकानदारी चालू ठेवतात. अशा लोकांकडे नागरिकही लक्ष देत नाहीत. जर एवढा मोठा कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला असतातर एकही सिमेंटची गोणी रस्तावर पडली नाही, असा याचा अर्थ होतो.

मात्र आज शहरातील रस्त्यांची कामे व दर्जा काय आहे हे नगरकर अनुभवत आहेत. नगरकर सुजाण आहेत. त्यामुळेच त्यांनी माझ्यासारख्याला दोनदा महापौर व तीनदा आमदार होण्याची संधी दिली आहे. प्रत्येक निवडणुकीत माझ्या मतांमध्ये व मताधिक्याही मोठी वाढ झाली आहे. त्यांनी किती आरोप केले तरी नगरकरांना सर्व सत्य माहिती असल्याने ते कधीच अशा खोट्या आरोपांना बळी पडले नाहीत. असेही जगताप यांनी म्हटले आहे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विधिमंडळाच्या गेटवर मध्यरात्री तुफान राडा, कार्यकर्त्यासाठी आव्हाड पोलिसांच्या गाडीखाली घुसले, खेचून बाहेर काढण्याची वेळ

**मुंबई :** विधिमंडळ परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि भाजपचे विधान परिषद आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांमध्ये झालेल्या राड्याने आता वेगळे वळण घेतले आहे. गुरुवारी रात्री उशिरा दोन वाजेपर्यंत विधिमंडळ परिसरात जोरदार पडसाद उमटले. मारहाण करणाऱ्यांना सोडून पोलिसांनी मार खाणाऱ्या कार्यकर्त्याला अटक केल्याचा आरोप करत जितेंद्र आव्हाड यांनी समर्थकांसह ठिय्या मांडला. विधान भवनाच्या गेटवर मध्यरात्री एक वाजता जितेंद्र आव्हाडांनी आंदोलन केल्यामुळे तणावाचं वातावरण निर्माण झाल होतं. विधानभवनाच्या मागच्या गेटवरुन जितेंद्र आव्हाड यांचे समर्थक नितीन देशमुख यांना पोलिस घेऊन जात असताना आव्हाड आणि कार्यकर्त्यांनी पोलिसांची कार अडवली आणि ठिय्या आंदोलन केले. सुमारे तासभर चाललेल्या या राड्यानंतर पोलिसांनी बळाचा वापर करत धरपकड सुरु केली. यावेळी आव्हाड थेट पोलिसांच्या गाडीखाली चालले होते. यावेळी पोलिसांनी त्यांना अक्षरशः फरफटत बाहेर ओढले. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे देखील घटनास्थळी हजर होते. विधिमंडळाचे अधिवेशन आज, १८ जुलै रोजी संपणार आहे. आदल्या दिवशी विधानसभेत विरोधी पक्षांचा अंतिम आठवडा प्रस्ताव जितेंद्र आव्हाड यांनी मांडला. त्यामध्ये त्यांनी आमदार गोपीचंद पडळकर यांच्याशी झालेल्या वाद आणि त्यानंतर आलेल्या धमक्यांविषयी माहिती दिली. यानंतर विधानभवनाच्या लॉबीत आव्हाडांचे कार्यकर्ते आणि पडळकरांचे कार्यकर्ते यांच्यात जोरदार वाद झाला. गोपीचंद पडळकर यांचा कार्यकर्ता ऋषिकेश



टकले आणि जितेंद्र आव्हाड यांचा कार्यकर्ता नितीन देशमुख यांच्यात बाचाबाची झाली. ङ्गङ्घयावेळी मार खाणाऱ्याला पोलिसांकडून अटक केली जात आहे. तर मारहाण करणाऱ्या पाच जणांची पोलिसांकडून पाठराखण केली जात आहे. त्यांना पोलीस वडापाव आणि तंबाखू मळून देत आहेतङ्घङ्घ असा आरोप जितेंद्र आव्हाड यांनी केला.


# व्यसनी मुलाचा हल्ला; आईचा जागीच मृत्यू, वडील गंभीर जखमी, घर बहिणींच्या नावावर केल्याचा राग....

**यवतमाळ:** दारूच्या आहारी गेलेल्या मुलाने फावड्याने केलेल्या हल्ल्यात आईचा जागीच मृत्यू तर वडील गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना बुधवारी रात्री साडेआठ वाजतादरम्यान बाभूळगाव तालुक्यातील यावली येथे घडली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी जितेंद्र डेबूर (३५) व त्याची पत्नी सुशीला डेबूर (३०) यांना अटक केली आहे. पार्वता महादेव डेबूर (६२) असे मृत आईचे तर महादेव डेबूर (६५) असे जखमी वडिलांचे नाव आहे. त्यांच्यावर यवतमाळच्या वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जितेंद्र याला दारूचे व्यसन होते. व्यसनामुळे जितेंद्र हा घर विकून टाकणार ही भीती आईवडिलांना होती. यातूनच त्यांनी गावातील जुने घर मुलींच्या नावावर केले. यावरून जितेंद्र अधिकच संतापला. रोज दारू प्राशन करून आल्यानंतर घर परत आपल्या नावावर करून घेण्यासाठी शिवीगाळ करू लागला. बुधवारी रात्री साडेआठ वाजतादरम्यान परत दारू प्राशन




आला आणि त्याने वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद वाढताच त्याने फावड्याने आईवडिलांवर हल्ला केला.आई पार्वता यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू तर वडील महादेव हे गंभीर जखमी झाले. आरडाओरड ऐकून शेजारी धावत आले. त्यांनी जखमी महादेव यांना बाभूळगावच्या शासकीय रुग्णालयात हलविले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना यवतमाळच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले. पोलिसांनीही तत्काळ घटनास्थळ गाठले. पंचनामा करून पार्वता यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविला. घटनेवेळी जितेंद्रची पत्नी सुशीला ही हजर होती. अधिक तपास पोलिस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक चौधरी करीत आहेत. महादेव डेबूर यांना तीन मुली आणि एक मुलगा आहे. मुलगा जितेंद्र हा व्यसनी असल्याने आपले वडिलोपार्जित घर विकून टाकणार ही भीती त्यांना सतावत होती. किमान आपले घर कुटुंबाकडे राहावे म्हणून त्यांनी ते मुलींच्या नावावर केले. हीच गोष्ट जितेंद्रला सतावत होती. मुलगा असताना मुलींना घर दिले म्हणून तो भांडू लागला. घरातील रोजचा हा वाद वाढला आणि आई पार्वता यांचा जीव गेला

# संपाने घेतला बळी; नालासोपाऱ्यातील ओला-उबरचालकाने संपवलं जीवन




**वसई:** ॲपआधारित टॅक्सीसेवा देणाऱ्या कंपन्यांकडून चालकांना अयोग्य मोबदला मिळत असल्याने चालकांनी संप पुकारला आहे. संपात सहभागी झालेल्या सनोज सक्सेना यांनी विषप्राशन करून आत्महत्या गुरुवारी केली. अन्य चालकांकडून सनोज सक्सेना यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आझाद मैदानात सभेचे आयोजन करण्यात आले आहे. चालकांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र केशव सभेचे अध्यक्ष डॉ. केशव क्षीरसागर यांनी आमरण उपोषणाची हाक दिली आहे. दरम्यान, गुरुवारीही चालकांचा संप सुरूच असून चालक सहभागी झाले होते.नालासोपारा पूर्वेकडील धानीव बागमधील श्रीधर कंपाउंड परिसरात सनोज पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा यांच्यासह राहत होते. ओला, उबर, रॅपिडो अशा ॲप आधारित टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांसाठी ते टॅक्सी चालवून प्रवासी वाहतूक करत होते. ॲप आधारित टॅक्सी कंपन्यांकडून अयोग्य मोबदला मिळत असल्याने ते त्रासले होते. याच त्रासातून बुधवारी रात्री सनोज यांनी विष प्राशन केले आणि गुरुवारी त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूने ॲपआधारित टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांकडून चालकांची होणारी पिळवणूक अधिक प्रखरपणे समोर आली आहे.आज, शुक्रवारी चालक सनोज सक्सेना यांच्यासाठी श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली आहे. चालकांच्या प्रश्नांची राज्य सरकारने दखल घ्यावी, यासाठी आमरण उपोषण करण्यात येणार आहे, असे महाराष्ट्र केशव सभेचे अध्यक्ष डॉ. केशव क्षीरसागर यांनी सांगितले. संपामुळे ॲप आधारित टॅक्सी आरक्षित करताना प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. चालकच नसल्याने अनेक कंपन्यांकडून चढ्या दराने भाडे आकारण्यात येत आहे.

# राज्यात बदल्यांचा धडाका सुरुच! २० अधिकाऱ्यांच्या बदलीचे पत्रक जारी, अनेकांना आयएएस पदोन्नती...

**मुंबई :** राज्य सरकारने प्रशासनात मोठे फेरबदल केले आहेत. राज्यातील २० अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. गेल्या सहा-सात महिन्यांपासून अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र सुरूच आहे. यात एम.एम.सूर्यवंशी यांना वसई-विरार महानगरपालिका वसई येथे महानगरपालिका आयुक्त म्हणून, तर दीपा मुधोळ-मुंडे यांना पुण्यात समाज कल्याण आयुक्त म्हणून मोठी जबाबदारी देण्यात आली आहे.२० अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून यात अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांना पदोन्नती देखील देण्यात आली आहे. जाणून घेऊयात कोणच्या अधिकाऱ्यांची कुठे बदली झाली...१) एम.एम. सूर्यवंशी (आयएएस:एससीएस: २०१०) यांची व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई येथून वसई-विरार महानगरपालिका वसई येथे महानगरपालिका आयुक्त पदावर बदली करण्यात आली. २) दीपा मुधोळ-मुंडे (आयएएस:आरआर: २०११) यांची अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड, पुणे येथून पुण्यात समाज कल्याण आयुक्त पदावर नियुक्ती करण्यात आली. ३) नीलेश गटणे (आयएएस:एससीएस: २०१२) यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे येथून व्यवस्थापकीय संचालक,



महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मुंबई येथे बदली करण्यात. ४) ज्ञानेश्वर खिलारी (आयएएस:एससीएस:२०१३) यांची संचालक, ओबीसी, बहुजन कल्याण, पुणे येथून अतिरिक्त सेटलमेंट आयुक्त आणि अतिरिक्त संचालक, भूमी अभिलेख, पुणे या पदावर नेमणूक करण्यात आली. ५) अनिलकुमार पवार (आयएएस:एससीएस:२०१४) यांची महानगरपालिका आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका, वसई येथून मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे येथे बदली करण्यात आली. ६) सतीशकुमार खडके (आयएएस:एससीएस:२०१४) यांना संचालक (आपत्ती व्यवस्थापन), महसूल आणि वन विभाग, मंत्रालय मुंबई येथून मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे येथे नियुक्त करण्यात आले आहे. ७) भालचंद्र चव्हाण (आयएएस: नॉन एससीएस: २०१९) यांची आयुक्त, भू-सर्वेक्षण विकास संस्था, पुणे येथून संचालक (आपत्ती व्यवस्थापन), महसूल आणि वन विभाग, मंत्रालय, मुंबई येथे नेमणूक करण्यात आली आहे. ८) सिद्धार्थ शुक्ला (आयएएस:आरआर:२०२३) यांच्या दिनांक ०२.०७.२०२५ च्या आदेशात बदल करुन सहाय्यक जिल्हाधिकारी, गोंडपिंपरी उपविभाग, चंद्रपूर यांना प्रकल्प अधिकारी म्हणून , धारणी आणि सहाय्यक जिल्हाधिकारी, धारणी उपविभाग, अमरावती म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ९) विजयसिंह शंकरराव देशमुख (अतिरिक्त जिल्हाधिकारी वर पदोन्नती) यांची अतिरिक्त आयुक्त-२, छत्रपती संभाजीनगर विभाग येथून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, मुंबई येथे व्यवस्थापकीय संचालक पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.१०) विजय सहदेवराव भाकरे (अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर पदोन्नती) यांची अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, भंडारा येथून सदस्य सचिव, विदर्भ वैधानिक विकास मंडळ नागपूर म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. ११) त्रिगुण शामराव कुलकर्णी (अतिरिक्त जिल्हाधिकारी वर पदोन्नती) यांची अतिरिक्त महासंचालक, , पुणे येथून यशदा, पुणे येथे उपमहासंचालक पदावर बदली करण्यात आली. १२) गजानन धोंडीराम पाटील (अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर पदोन्नती) यांची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे येथून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. १३) पंकज संतोष देवरे (अतिरिक्त जिल्हाधिकारी आयएएस) यांची अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, लातूर येथून पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड, पुणे येथे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक पदावर बदली करण्यात आली. १४) महेश भास्करराव पाटील (अतिरिक्त जिल्हाधिकारी आयएएस म्हणून पदोन्नती) यांची अतिरिक्त विभागीय आयुक्त (महसूल) पुणे विभाग येथून आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे इथं आयुक्त पदावर नेमणूक करण्यात आली. १५) मंजिरी मधुसूदन मानोलकर (अतिरिक्त जिल्हाधिकारी, म्हणून पदोन्नती) यांची सहआयुक्त, (पुनर्वसन), नाशिक विभाग, नाशिक येथून व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. १६) आशा अफझल खान पठाण (अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर पदोन्नती) यांची सहसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूर येथून सहसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूर या पदावर बदली करण्यात आली आहे. १७) राजलक्ष्मी सफिक शाह (अतिरिक्त जिल्हाधिकारी वर पदोन्नती) यांची अतिरिक्त विभागीय आयुक्त (जनरल), कोकण विभाग, मुंबई येथून व्यवस्थापकीय संचालक, , मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. १८) सोनाली नीलकंठच मुळे (अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर पदोन्नती) यांची अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, अमरावती येथून संचालक, , बहुजन कल्याण, पुणे या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. १९) गजेंद्र चिमंतराव बावणे (अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर पदोन्नती) यांची अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, बुलढाणा येथून आयुक्त, भू सर्वेक्षण विकास संस्था, पुणे या पदावर बदली करण्यात आली आहे. २०) प्रतिभा समाधान इंगळे (अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर पदोन्नती) यांची अध्यक्ष, जिल्हा जात वैधता समिती, सांगली येथून आयुक्त, अल्पसंख्याक विकास, छत्रपती संभाजी नगर या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

# मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात, - मिनी बस एकमेकांवर आदळल्या, गाड्यांचा चेंदामेंदा, १९ जण जखमी



**मुंबई**-गोवा राष्ट्रीय महामार्गावर रत्नागिरी निवळी येथे दोन महिन्यांपूर्वी चिपळूण येथे शिक्षक प्रवासी असलेली खाजगी ट्रॅव्हल्स व गॅस टँकरचा अपघात झाल्याची घटना घडली होती. आता पुन्हा एकदा याच महामार्गावर एक आणखी भीषण अपघात झाला आहे. एसटी बस आणि खाजगी मिनी ट्रॅव्हल्स यांच्यात समोरासमोर झालेल्या धडकेमुळे हा भीषण अपघात झाला असून यामध्ये एकूण १९ प्रवासी जखमी झाले आहेत. तर मिनी ट्रव्हल्स चालक गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात झाल्याचं समजतात तात्काळ संगमेश्वर पोलिसांनी आणि स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत मदत कार्य सुरू केलं. चिपळूणहून रत्नागिरीला येणारी मिनी बस आणि रत्नागिरीहून चिपळूणच्या दिशेने जाणारी बस यांच्यात हे समोरासमोर धडक झाली. अपघातात मिनी बसचा दर्शनी भाग पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे. मिनीबस चालक गंभीर जखमी झाला असून तो अडकून पडल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. एस. टी मधील ६ जण तर मिनी बस मधील १३ जण जखमी झाले आहेत. मुंबई गोवा महामार्गाचे काम करणाऱ्या ठेकेदार कंपनीच्या हलगर्जीपणामुळे हा अपघात झाल्याचे स्थानिकांनी सांगितले. या ठिकाणी वर्णमार्ग अपेक्षित आवश्यक असताना असा मार्ग नसल्यामुळेच हा अपघात झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली.दरम्यान, या अपघातानंतर संबंधित ठेकेदार कंपनीला जाग आली असून आता कामाला सुरुवात करण्यात आली आहे. जखमी झालेले सगळे प्रवासी चिपळूण रत्नागिरी संगमेश्वर परिसरातील आहेत. या सगळ्या प्रवाशांची प्रकृती आता स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

संगमेश्वर पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद करण्याची कार्यवाही सुरू असून अधिक तपास संगमेश्वर पोलीस करत आहेत. मिनी बस चालक गंभीर असल्याने त्याला रत्नागिरी येथे हलवण्यात आले आहे.

तर अन्य दोघांना खासगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. त्यामुळे त्यांची नावे समजू शकलेली नाहीत.मिनी बस चालक गंभीर असल्याने त्याला रत्नागिरी येथे हलवण्यात आले आहे. तर अन्य दोघांना खासगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. त्यामुळे त्यांची नावे समजू शकलेली नाहीत.

# ते दोघं चहा पित आहेत, गुप्त माहिती, अल्पवयीनवर अत्याचार करणाऱ्यांना पुण्यात अटक, राजस्थानशी काय कनेक्शन?



**पुणे:** एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या दोघांनी पुण्यातून अटक करण्यात आली आहे. या दोघांनी राजस्थानमध्ये या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. राजस्थानमधील बॉसवाडा जिल्ह्यातील लोहारीया पोलीस स्टेशनच्या हद्दीत अल्पवयीन मुलीवर (टोपन नाव निर्भया) फूस लावून लैंगिक अत्याचार करणाऱ्या दोन आरोपींना पुण्यातील चंदननगर परिसरातून अटक करण्यात आली आहे. अटक आरोपींना पुढील कारवाईसाठी राजस्थान पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. १४ जुलै २०२५ रोजी राजस्थानच्या बॉसवाडा जिल्ह्यातील लोहारीया पोलीस स्टेशनमध्ये एक अल्पवयीन मुलगी फूस लावून पळवून नेल्याचा आणि तिच्यावर अत्याचार केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी लाला रामु बमनिया (वय २२, रा. बॉसवाडा, राजस्थान) आणि सुरेश लक्ष्मण खराडी (वय १९, रा. सदर) या दोघांविरुद्ध भा. न्या. सं. कलम १३७ (२), ६५ (१), तसेच कायद्यान्वये कलम ३, ४ आणि कायद्यान्वये कलम ८४ अंतर्गत गु. र. नं. ८७/२०२५ नोंदवण्यात आला होता.गुन्हा केल्यानंतर हे दोन्ही आरोपी फरार झाले होते. १५ जुलै रोजी आरोपी पुण्यातील चंदननगर भागात एका चहाच्या टपरीवर काम करत असल्याची माहिती राजस्थान पोलिसांना मिळाली होती. ही माहिती पुणे पोलिसांना मिळाल्यानंतर, चंदननगर पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती सीमा ढाकणे, तसेच अपर विशेष गुन्हे शाखा २ चे पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड आणि त्यांच्या पथकाने तातडीने तपास सुरू केला.त्यानंतर चंदननगर बाजार परिसरात शोध घेत असताना आरोपींना पोलिसांच्या हालचालीची कल्पना आली आणि त्यांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी तत्परता आणि गोपनीय माहितीच्या आधारे त्यांचा पाठलाग करून आरोपींना तुकारामनगर, खराडी येथून ताब्यात घेतले.


अटक करण्यात आलेले आरोपी लाला रामु बमनिया आणि सुरेश लक्ष्मण खराडी सध्या पुणे पोलिसांच्या ताब्यात असून दोन्ही आरोपींना राजस्थानच्या लोहारीया पोलीस स्टेशनच्या ताब्यात सुपूर्द करण्यात येणार आहे, अशी माहिती आहे.

## बीसीसीआयचा बुमराहला एक न्याय तर सिराजवर अन्याय, भारतीय क्रिकेटरने सांगितलं संघातलं कटू सत्य



**लंडन :** भारताचा संघ एकच असला तरी बीसीसीआय जसप्रीत बुमराहला एक न्याय आणि मोहम्मद सिराजवर अन्याय करत आहे. सध्याच्या सुरु असलेल्या कसोटी मालिका सुरु असताना भारताच्या क्रिकेटपटूनेच एक कटू सत्य सर्वांसमोर मांडलं आहे.जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज हे दोघेही वेगवान गोलंदाज. दोघेही भारताच्या गोलंदाजीचे सारथ्य करतात. जेव्हा बुमराह संघ नसतो, तेव्हा मोहम्मद सिराज हा भारताचा फ्रंट लाइन बॉलर असतो. पण हे दोघे भारतीय संघासाठी समान कामगिरी करत असले तरी त्यांच्यामध्ये बीसीसीआय फरक करत असल्याचे आता भारताच्या क्रिकेटपटूने दाखवून दिले आहे.भारताचा माजी क्रिकेटपटू आकाश चोप्रा यावेळी म्हणाला की, ङ्ङ मोहम्मद सिराज हा भारतासाठी जेव्हा खेळण्यासाठी मैदानात उतरतो, तेव्हा आपले शंभर टक्के योगदान तो देत असतो. वेगवान गोलंदाज मोठे स्पेल टाकत नाहीत. पण मोहम्मद सिराज हा किती षटके टाकायला सांगितली तरी टाकतो, कोणतीही नाटकं तो कधीच करत नाही. पण सर्वात महत्वाची गोष्ट ही आहे की, त्याच्याबाबत तेवढी चर्चा होत नाही. माझ्यामते ही चुकीची गोष्ट आहे. आता चौथा कसोटी सामना खेळवला जाणार आहे, त्यापूर्वी बुमराहची जोरदार चर्चा सुरु झाली आहे. तो चौथा कसोटी सामना खेळणार की नाही, पण भारतासाठी तेवढाच महत्वाचा मोहम्मद सिराजही आहे, मग त्याच्याबाबत चर्चा का होत नाही. जसप्रीत बुमराहसाठी वर्कलोड मॅनेजमेंटची कारणं दिली जातात, पण सिराजच्या वर्कलोडबाबत काय, हा प्रश्न कोणालाच कसा पाड पडत नाही, याचे मला आश्चर्य वाटते. कारण बीसीसीआय बुमराहच्या वर्कलोडबाबत बोलते, पण सिराजबाबत ही चर्चा का होत नाही, हे काही समजत नाही ङ्ङजसप्रीत बुमराह हा इंग्लंडमध्ये वर्कलोड मॅनेजमेंटमळे फक्त तीनच सामने खेळणार आहे. पण मोहम्मद सिराज हा या दौऱ्यात सर्व सामने खेळणार आहे. पण सिराजबाबत ही चर्चा का होत नाही, असा सवाल आता भारताच्या माजी क्रिकेटपटूने विचारला आहे. त्यामुळे आता बीसीसीआय या प्रश्नावर काय उत्तर देते, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

## २० वर्षांहून लहान अभिनेत्यासोबत रोमान्स करणार बेबो, पहिल्यांदाच दिसणार अशा हटके भूमिकेत...



बॉलिवूडची बेबो करिना कपूर खान करिना तिच्या आगामी सिनेमात एका हटके सिनेमात दिसणार आहे. इतकंच नाही तर, बेबो या चित्रपटात २० वर्षांनी लहान असलेल्या अभिनेत्यासोबत रोमान्स करताना दिसणार आहे. या चित्रपटात ती प्रथमच भूत म्हणून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाची कथा हटके असून करिना पहिल्यांदाच अशा प्रकारच्या भूमिकेत दिसणार आहे. हा चित्रपट एक हॉरर चित्रपट असणार आहे.बॉलिवूड इंडस्ट्रीत अनेक स्टार्स त्यांच्यापेक्षा कमी वयाच्या अभिनेत्रींसोबत रोमान्स करताना दिसले आहेत.शाहरुख खान असो किंवा सलमान खान, अक्षय कुमार प्रत्येकानं तरुण अभिनेत्रींसोबत स्क्रीन शेअर केली आहे.अलिकडेच रणवीर सिंग त्याच्या आगामी धूरंधर चित्रपटात सारा अर्जुनसोबत रोमान्स करताना दिसला.त्या दोघांच्या वयात २० वर्षांचे अंतर आहे.आता ४४ वर्षांची करिना कपूरही यांच्या २० वर्षांहून लहान अभिनेत्यासोबत रोमान्स करणार आहे. पण हा अभिनेता नेमका कोण? हे अद्याप गुलदस्त्यात आहे.मिळालेल्या माहितीनुसार करिनाच्या या चित्रपटाची कथा हुसैन दलाल यांनी लिहिली आहे.मात्र, या चित्रपटाचे नाव काय असेल आणि तो कधी प्रदर्शित होईल, याबाबत कोणतीही माहिती समोर आलेली नाही.करिना कपूर गेल्या वर्षी क्रू आणि सिंघम अगेन मध्ये दिसली होती.क्रू मध्ये करिनासोबत तब्बू आणि क्रिती सेनन होत्या, हा चित्रपट विशेष कमाल दाखवू शकला नाही.तर, सिंघम अगेनने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली होती. आता करिना मेघना गुलजार यांच्यासोबत काम करत आहे . ती आगामी दायरा या सिनेमात दिसणार आहे.हा एक क्राइम-ड्रामा थ्रिलर चित्रपट आहे.दरम्यान, करिनाच्या फिटनेसही सध्या चर्चा सुरू आहे. फिटनेस राखण्यासाठी सेलिब्रिटी काय करतात, हा मुद्दा चाहत्यांसाठी उत्सुकतेचा असतो. काटेकोर आहार आणि व्यायाम याचा विचार करता अभिनेत्री करीना कपूरचं नेहमीच कौतुक होतं. गेल्या १७ वर्षांत तिनं तिचे आहाराचं वेळापत्रक बदललेलं नाही. आहार आणि योग हे तिच्या फिटनेसचं रहस्य असल्याचं करीनाच्या आहारतज्ज्ञ ऋजुता दिवेकर यांनी सांगितलं.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी २२ जुलै रोजी खामगाव येथे रोजगार मेळावा आणि मार्गदर्शन सत्राचे आयोजन

## चिखली येथे प्लेसमेंट ड्राइव्ह

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील युवक-युवतींना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी मिळाव्यात आणि त्यांच्या करिअरला योग्य दिशा मिळावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत खामगाव आणि चिखली येथे पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणि रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. हा रोजगार मेळावा दि. २२ जुलै २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता खामगाव येथील श्री सिध्दीविनायक टेक्निकल कॅम्पस, जिल्हा शेगाव रोड येथे पार पडणार आहे. या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून अनेक नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच याच दिवशी सकाळी १०.३० वाजता जि. एस. विज्ञान, कला आणि वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथे रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजना तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना याबाबत विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले आहे. याशिवाय, दुपारी १.०० वाजता श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली येथे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची नोंदणी प्रक्रिया, स्वयंरोजगार संधी आणि प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात आले आहे. या ठिकाणी देखील नामांकित कंपन्यांकडून भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. या रोजगार मेळाव्यासाठी पात्र उमेदवारांनी आपले बायोडेटा, फोटो व शैक्षणिक कागदपत्रांसह वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगार व प्रशिक्षणाच्या संधी मिळाव्यात हा आमचा मुख्य उद्देश आहे. इच्छुकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.

# रक्षाबंधनानिमित्त राखी व भेटवस्तू पाठवण्यासाठी डाक विभागाची विशेष राखी मेल सेवा

जनसंचलन/ डोणगाव


रक्षाबंधन हा भाऊ व बहिणीचा, बंधुत्वाचा, प्रेमाचा आणि विश्वासाचा पवित्र सण यंदा दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी साजरा होणार आहे. या विशेष प्रसंगी आपल्या बहिणींनी पाठवलेली राखी वेळेत पोहचावी यासाठी बुलढाणा डाक विभागाने विशेष राखी मेल सेवा सुरू केली आहे. बुलडाणा विभागातील सर्व प्रधान डाकघरे, उप डाकघरे आणि शाखा डाकघरे यामधून नागरिक राखी, ग्रीटिंग कार्ड्स आणि भेटवस्तू अत्यंत सहजतेने आणि विश्वासाने देशभर पाठवू शकणार आहेत. या सेवेच्या वैशिष्ट्यपूर्ण सुविधा: विशेष राखी मेल व्यवस्थेअंतर्गत राख्या प्राधान्याने वितरित केल्या जातील. स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर्ड पार्सल सेवांतर्गत राखी आणि गिफ्ट्स जलद व सुरक्षितपणे पोहोचविण्यासाठी. ट्रॅकिंग सुविधेंतर्गत स्पीड पोस्टद्वारे पाठवलेली राखी व गिफ्ट्स यांचे इंटरनेटद्वारे सहज ट्रॅकिंग करता येईल. परदेशातही राखी पाठवण्याची सोय या सुविधेंतर्गत इतर देशांतही राखी स्पीड पोस्टने पाठवता येईल. सर्व नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा आणि रक्षाबंधनाचा आनंद आपल्या प्रिय व्यक्तींशी डाक विभागाच्या मदतीने साजरा करावा. अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या डाकघराशी संपर्क साधावा, असे आवाहन डाक अधीक्षक गणेश बा. आंभोरे यांच्यातर्फे करण्यात आले आहे.

# देवाजीच्या मनात काय? आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले..

## व्यवस्थेने कैलास नागरे यांचा बळी घेतला!स्वर्गीय कैलास नागरे यांच्या कुटुंबीयांना न्याय केव्हा!

जनसंचलन/बुलढाणा

शेतकऱ्यांसाठी बलिदान देणारे युवा शेतकरी पुरस्कार प्राप्त स्व.कैलास नागरे यांची न्यायिक बातमी हॅलो बुलढाणाने वेळोवेळी लावून धरली मात्र ढिम्म सरकारने नागरे कुटुंबीयांना अद्यापही न्याय न दिल्याने आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यवस्थेनच कैलास नागरे यांचा बळी घेतला असा आरोप करून,शासनाने त्यांच्या कुटुंबीयांना दिलेला शब्द पाळावा,अशी मागणी विधिमंडळात केली आहे. खडक पुन्हा प्रकल्पातून शिवनी आरमाळ परिसरातील छोट्या धरणांमध्ये पाणी सोडले जावे,कालव्यातून शेतीसाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी अनेक निवेदने साखळी उपोषण करून प्रशासनाचे लक्षवेधणारे युवा शेतकरी कैलास अर्जुनराव नागरे (४४) यांनी १३ मार्चला होळीच्या दिवशी शेतात सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली होती. दरम्यान काही नेतेमंडळी यांनी त्यांचे घर गाठून धीर दिला आणि आश्वासनांची खैरात केली होती.प्रामुख्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकत्व स्वीकारणार असल्याचे जाहीर केले



होते.याचे आदेश निघाले नाहीत. एका बोटचेप्या पोर्टल न्यूजने पीए विद्याधर महाले यांनी त्यांच्याशी संपर्क साधून त्यांनीच प्रस्ताव पाठविला नसल्याचे मुख्यमंत्र्यांच्या विषयी सकारात्मक बातमी टाकून गवगवा केला. प्रत्यक्षात नागरे कुटुंबीयांना दोन आपत्य आहेत. मुलगी अभियंत्रीत शिक्षण घेते तर मुलगा इयत्ता नववी मध्ये शिकत असून शैक्षणिक सत्र उलटले तरी,मुख्यमंत्र्यांची अजूनही कुठली मदत मिळाली नाही.स्वाती नागरे यांना कुठली नोकरी दिलेली नाही. त्यामुळे नागरिक कुटुंबीयांना न्याय द्यावा अशी मागणी,आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधिमंडळात केली.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा...



जनसंचलन/बुलडाणा

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. सदर स्पर्धे चा अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलद्वारेच दि. २० जुलै २०२५ पासून दि. २० ऑगस्ट २०२५ पर्यंत स्वीकारण्यात येणार आहेत. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील. सदर स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट,ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल. २७ ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सव स्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना रु.२५ हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

# आमदार संजय गायकवाड यांना चॅलेंज देणारे इम्तियाज जलील बुलढाण्यात येणार!

**जनसंचलन/बुलडाणा**

कॅन्टीन मारहाण प्रकरण राज्यभर गाजत असताना, माजी खासदार इम्तियाज जलील यांनी आमदार संजय गायकवाड यांच्यावर जहाल टीका करीत लुंगी सोडून कानशिलात लगावण्याचे वक्तव्य केले होते. यावर आम. गायकवाड यांनी देखील जलील यांच्यावर हल्लाबोल करीत इतना मारूंगा.. इतना मारूंगा.. अशा धमकीचे प्रतिउत्तर दिले. दरम्यान इम्तियाज जलील यांनी जगह आपकी..वक्त आपका..बताईये कहाँ आना है?असे आम. गायकवाडांना चॅलेंज केल्यानंतर ते बुलढाण्यातील इक्बाल चौकात २० जुलै रोजी येत आहेत. यावेळी आ. गायकवाड किंवा माजी खा.जलील यांच्यात काय कलगीतुरा रंगतो हे पाहणे उत्सुकाचे ठरणार आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी आकाशवाणी आमदार निवास येथील कॅन्टीनमधल्या कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. यावर प्रतिक्रिया देताना एमआयएमचे नेते माजी खासदार इम्तियाज जलील यांनी जोरदार हल्लाबोल केला होता. मी त्या वेटरच्या जागी असतो तर आमदार संजय गायकवाड यांची लुंगी सोडून कानशिलात लगावली असती, असे जलील यांनी म्हटले होते. त्यानंतर जलील यांच्या या वक्तव्याला आमदार संजय गायकवाड यांनी प्रत्युत्तर दिले. तुम्ही त्या हॉटेलचे कंत्राट घेऊन दाखवा, या वेटरला तर दोनच घुसे मारले आहेत, तुम्हाला एवढा मारेल की तुम्ही हॉटेल चालवायच्या लायकीचे सुद्धा राहणार नाही, असे आमदार संजय गायकवाड यांनी इम्तियाज जलील यांना म्हटले. दरम्यान इम्तियाज जलील यांनी पुन्हा याचे प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, मला धमकाविण्याची भाषा करताहेत.. आमदार गायकवाड साहेब.. जागा तुमची, वेळ तूमची .. सांगा कुठे यायचे आहे? मला तुमच्याशी काही घेणे देणे नाही.परंतू तुम्ही





काही चुकीची हरकत करत असाल आणि त्या गरीबासाठी आवाज उठविणारा कोणी नसेल अन् आपले मुख्यमंत्री हसत हसत या प्रकरणा वर उत्तर देत असतील तर अशा गरीबासाठी मी जरूर उभा राहील! यानंतर इम्तियाज जलील बुलढाणा दौऱ्यावर येणार असून,शहरातील इकबाल चौकात त्यांची सभा आयोजित करण्यात आली आहे.त्यानंतर मोताळा,मलकापूर व नांदुरा येथे सुद्धा त्यांची सभा होणार आहे. दरम्यान आमदार संजय गायकवाड यांनी त्यांना मारण्याचे खुले चॅलेंज केले होते आणि आता ते त्यांना थेट भिडतील की त्यांच्यावर नुसतीच तोफ डागणार? याची चर्चा सुरू आहे.

---

# अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी राज्य शासनाची कडक भूमिका!

## संबंधित विभागांची संयुक्त जबाबदारी निश्चित!

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या मंत्रालयातून एका महत्त्वपूर्ण निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली असून, राज्यातील गौण खनिज म्हणजेच वाळू, मुरुम, गिट्टी इत्यादींच्या बेकायदेशीर उत्खनन व वाहतुकीवर अंकुश ठेवण्यासाठी पोलीस, परिवहन, जलसंपदा आणि महसूल विभाग यांची संयुक्त जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.परंतु हे शक्य होणार काय? असा प्रश्न चर्चिला जात आहे सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत ज्ञानदेव खरात यांनी वारंवार केलेल्या पाठपुराव्यानंतर शासन स्तरावर ही कारवाई झाली असून, त्यांना शासनाच्या विविध विभागांकडून प्राप्त झालेली पत्रे आणि अहवाल याचे प्रत्यंतर आहे. दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी गृह विभाग, मुख्यमंत्री कार्यालय, मुख्य सचिव आणि महसूल व वन विभागाकडून ऑनलाईन प्रणालीद्वारे पत्र व्यवहार करण्यात आला होता. यामध्ये चंद्रकांत खरात यांनी सादर केलेल्या अर्जातील परिच्छेद क्रमांक २ मध्ये मांडलेल्या मुद्द्यांचा विशेषतः विचार करण्यात आला. त्यानंतर दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी शासन निर्णयान्वये नवीन वाळू धोरण निश्चित करण्यात आले असून, त्यात बेकायदेशीर उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी



विविध उपाययोजना आणि जबाबदाऱ्या स्पष्टपणे नमूद करण्यात आल्या आहेत. सदर निर्णय शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. यापूर्वी लोक आयुक्त मुंबई यांच्या कडे दाखल केलेल्या प्रकरणाच्या अनुषंगाने दिनांक ५ नोव्हेंबर २०२४ रोजी संबंधित कार्यवाही बाबत सविस्तर अहवाल मागविण्यात आला होता. त्यानुसार १३ जून २०२५ रोजी मराठीतील अहवाल टपालाने पाठविण्यात आला होता आणि आता त्याच अहवालाची इंग्रजी प्रत तसेच धोरणात्मक माहिती पुन्हा एकदा संलग्न करून, डॉ उमेश राठोड (कक्ष अधिकारी, महसुल व वन विभाग महाराष्ट्र शासन) यांच्या मार्फत दिनांक ८ जुलै २०२५ रोजी पाठविण्यात आलेली आहे.या घडामोडीमुळे राज्यात बेकायदेशीर वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर गंडांतर येण्याची शक्यता असून, प्रशासनाची जबाबदारी आता अधिक स्पष्टपणे निश्चित झाल्यामुळे जनतेमध्ये सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहे. चंद्रकांत खरात यांनी सांगितले की, राज्यात वाळू माफियांना रोखण्यासाठी मी गेल्या अनेक वर्षांपासून संघर्ष करत आहे. आता शासनाने सर्व विभागांची जबाबदारी निश्चित करून हा लढा बळकट केला आहे. पुढील टप्प्यात आम्ही याची अंमलबजावणी कशी होते, यावर लक्ष ठेवणार आहोत.

---

# कु. रुखमा प्रकाश भोपळेचा एकनिष्ठा फाउंडेशनने केला सत्कार



**जनसंचलन/ खामगांव**

तालुक्यातील निमकवळा येथील एकदम गरीब आदिवासी कुटुंबातील कु. रुखमा प्रकाश भोपळे हिला तीन वर्षा पूर्वी रक्ताची अत्यंत गरज होती त्यावेळी तिच्या नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला होता परंतु त्यावेळेस त्यांना रक्त मिळत नव्हते त्यांना सामान्य रुग्णालयातून एकनिष्ठा फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष सुरजभैय्या यादव यांचा नंबर मिळाला त्यांनी लगेच ४ रक्तदाते नेऊन कु. रुखमा हिच्यासाठी रक्त जमा केले मग लगेच तिला डॉक्टर कडून रक्त लावण्यात आले होते. तिची प्रकृती सुधरताच तिने एकनिष्ठा फाउंडेशनचे आभार मानले व भविष्यात मि सुद्धा एकनिष्ठा फाउंडेशनच्या उपक्रमा मध्ये सहभागी होऊन लोकांची मदत करेल अशी प्रतिक्रिया व्यक्त केली होती सुरजभैय्या यादव यांनी तिला धिर दिला आणि तिला एकच वाक्य सांगितले होते की तू अभ्यासाकडे लक्ष दे तुझे जे काही स्वप्न आहे ते लवकर साकार होतील मागील तीन वर्षा पासून जिद्द चिकाटीने मेहनत लगन लावून अभ्यास करून परीक्षा उत्तीर्ण करत घव घवीत यश संपादन करत शेवटी कु. रुखमा प्रकाश भोपळे राहणार निमकवळा हिची अप्पर आदिवासी विकास आयुक्त ठाणे शासकीय अधीक्षक पदी निवड झाली. दिनांक १८ रोजी दुपारी २ वाजता तिचा सत्कार एकनिष्ठा रक्तदाता फाउंडेशन तर्फे शासकीय रक्तपेढी मध्ये रक्तदान करून बुके देऊन सत्कार करण्यात आला यावेळी सुरजभैय्या यादव , सौ. शिल्पा सिंघानिया, जय पारीक , निखिल हजारे , आदर्श साकला, ओम सिंघानिया , शासकीय रक्तपेढीचे आदि लोक उपस्थित होते अशी माहिती प्रदीप शमी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८